सुधारित

New नियमावली

2025-2026.

# प्राथमिक शिक्षण विभाग,

# जिल्हा परिषद, सोलापूर.

## प्रवेश प्रक्रिया फाईल

## सन २०२५-२०२६

विषय :-जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृह, पार्क चौक, सोलापूर व सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, शेळगी, जिल्हा परिषद, सोलापूर

# जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृह, पार्क चौक, सोलापूर व सावित्रीबाई फुले विद्यार्थीनी वसतिगृह, शेळगी, जिल्हा परिषद, सोलापूर

## नवीन प्रवेश प्रक्रिया नियमावली

## सन २०२५-२०२६

१) चालू शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी अर्ज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. zpsolapur.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

२) दिनांक १६/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत प्रवेश अर्ज त्या-त्या वसतिगृहाच्या ठिकाणी स्विकारले जाईल. (शासकीय सुट्ट्या सोडून)

३) फक्त सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या व सोलापूर शहरातील महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना प्रवेश दिला जाईल.

४) पूर्णवेळ अगर अर्धवेळ शासकीय, निमशासकीय, खाजगी नोकरी करणाऱ्यांनी व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांनी प्रवेशासाठी अर्ज करू नये.

५) कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनी व कोणत्याही कारणास्तव प्रवेश नाकारलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज करू नये.

६) एका वर्षापेक्षा कमी कालावधीचा कोर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज करू नये.

७) वसतिगृह प्रवेश क्षमता मर्यादित असल्याने क्षमतेपेक्षा जादा अर्ज प्राप्त झाल्यास प्रवेश लॉटरी पध्दतीने देण्यात येईल व निकषानुसार प्रवेश देण्यात येईल.

८) आपला प्रवेश दिनांक ३१/०५/२०२६ रोजीपर्यंत असेल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(कादर शेख)
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, सोलापूर.

## जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृह, पार्क चौक, सोलापूर व सावित्रीबाई फुले विद्यार्थ्यांनी वसतिगृह, शेळगी, जिल्हा परिषद, सोलापूर

## नवीन प्रवेश प्रक्रिया नियमावली

## सन २०२५-२०२६

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अर्ज प्रसिध्दी दिनांक | :- | दि.०१/०७/२०२५ ते १०/०७/२०२५ अखेर |
| २. | प्रवेश अर्ज स्विकृती | :- | दि.११/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ |
| ३. | प्रवेश अर्जाची छाननी | :- | दि.२२/०७/२०२५ ते २४/०७/२०२५ |
| ४. | प्रवेशमान्य विद्यार्थ्यांची यादी जाहीर | :- | दि.२५/०७/२०२५ ते २८/०७/२०२५ |
| ५. | प्रवेश शुल्क भरणे व अनामत रक्कम भरणे (चलनाद्वारे) | :- | दि.२९/०७/२०२५ ते ३१/०७/२०२५ |
| ६. | प्रत्यक्ष वसतिगृह सुरू | :- | दि.०१/०८/२०२५ पासून |
| ७. | दि.३१ मे २०२६ पर्यंत वसतिगृह चालू राहील. | | |
| ८. | सोबतच्या नियमावलीप्रमाणे | | |

(कादर शेख)
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, सोलापूर

**जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृह, पार्क चौक, सोलापूर व सावित्रीबाई फुले विद्यार्थीनी वसतिगृह, शेळगी, जिल्हा परिषद, सोलापूर**

## नवीन प्रवेश प्रक्रिया सन २०२५-२०२६

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रहिवासी असलेल्या सोलापूर शहरातील शासनमान्य विद्यालय व महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना प्रवेश दिला जाईल. एका वर्षापेक्षा कमी कालावधीचा कोर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज करू नये, नापास झालेल्या व ट्युशन लावलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींनी प्रवेश अर्ज करू नये. पूर्णवेळ अगर अर्धवेळ शासकीय, निमशासकीय व खाजगी नोकरी करणाऱ्यांनी प्रवेशासाठी अर्ज करू नये. यापूर्वी कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना व कोणत्याही कारणास्तव प्रवेश नाकारलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रवेशासाठी पुन्हा अर्ज करू नये. एकदा प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही सबबीवर प्रवेश प्रक्रियेच्यावेळी प्रवेश रद्द केला जाणार नाही व भरलेली रक्कम परत मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

(सोबत जोडावे : १) गुणपत्रक, २) रहिवाशी प्रमाणपत्र, ३) आधारकार्ड (विद्यार्थी व पालक), ४) सध्याचे ३ आय.डी.साईज फोटो, ५) रेशनकार्ड, ६) स्वत:चे बँक पासबुक (राष्ट्रीयकृत बँकेचे) झेरॉक्स प्रत.

(कादर शेख)
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, सोलापूर

## जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृह, पार्क चौक, सोलापूर व सावित्रीबाई फुले विद्यार्थीनी वसतिगृह, शेळगी, जिल्हा परिषद, सोलापूर

## नवीन प्रवेश प्रक्रिया सन २०२५-२०२६

१) ऑनलाईन फॉर्म प्रिंट काढणे. zpsolapur.gov.in

### प्रवेश फी बाबत

| जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतीगृह | | | | सावित्रीबाई फुले मुलींचे वसतीगृह | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्रवेश फी | ६०००/- | | १) | प्रवेश फी | ५०००/- |
| २) | अनामत | १०००/- | | २) | अनामत | १०००/- |
| ३) | ओळखपत्र | ५०/- | | ३) | ओळखपत्र | ५०/- |
| ४) | फॉर्म फी | ५०/- | | ४) | फॉर्म फी | ५०/- |
| | **एकूण** | **७१००/-** | | | **एकूण** | **६१००/-** |

**प्रवेशाकरिता कागदपत्रे खालीलप्रमाणे :-**

१) आधारकार्ड (स्वत: व पालक)

२) रेशनकार्ड (पालकांचे)

३) गुणपत्रिका प्रत (उत्तीर्ण झालेले)

४) बोनाफाईड प्रमाणपत्र व सध्याचे आयडेंटी साईज ३ फोटो

५) चालू शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ महाविद्यालय/उच्च महाविद्यालय ओळखपत्र

६) प्रवेश अर्जावर आपल्या तालुक्यातील पंचायत समिती गटविकास अधिकारी किंवा गटशिक्षणाधिकारी यांची सही व शिक्का घेणे.

(कादर शेख)
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, सोलापूर

<u>**प्रेसनोट**</u>

## जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृह, पार्क चौक, सोलापूर व सावित्रीबाई फुले विद्यार्थीनी वसतिगृह, शेळगी, जिल्हा परिषद, सोलापूर

### प्रवेश ! प्रवेश !! प्रवेश !!!

नवीन प्रवेश प्रक्रिया नियोजन

१) अर्ज प्रसिध्दी दिनांक : दि.०१/०७/२०२५ ते १०/०७/२०२५

२) प्रवेश अर्ज स्विकृती दिनांक :- दि.११/०७/२०२५ ते २१/०७/२०२५

३) प्रवेश अर्जाची छाननी :- दि.२२/०७/२०२५ ते २४/०७/२०२५

४) प्रवेशमान्य विद्यार्थ्यांची यादी जाहीर:- दि.२५/०७/२०२५ ते २८/०७/२०२५

५) प्रवेश शुल्क भरणे व अनामत रक्कम भरणे (चलनाद्वारे) : दि.२९/०७/२०२५ ते ३१/०७/२०२५

६) प्रत्यक्ष वसतीगृह सुरू : दिनांक ०१/०८/२०२५ पासून

७) दिनांक ३१ मे २०२६ पर्यंत वसतीगृह चालू राहील.

सोबतच्या नियमावली व फॉर्मसाठी zpsolapur.gov.in या संकेतस्थळावरून उपलब्ध करून घ्यावे. दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

(कादर शेख)
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, सोलापूर

# प्रेसनोट

## वसतीगृह प्रवेश प्रक्रिया

zpsolapur.gov.in या संकेतस्थळावरून प्रवेश फॉर्म उपलब्ध करून पूर्ण वाचन करून परिपूर्ण माहिती भरून संबंधित वसतीगृहात दि.११/०७/२०२५ ते दि.२१/०७/२०२५ सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० वा. पर्यंत अर्ज स्विकार करण्यात येईल.

### जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृह, पार्क चौक, सोलापूर व सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, शेळगी, जिल्हा परिषद, सोलापूर

**प्रवेश शुल्क माहिती :-**

| जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतीगृह | | | | सावित्रीबाई फुले मुलींचे वसतीगृह | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्रवेश फी | ६०००/- | | १) | प्रवेश फी | ५०००/- |
| २) | अनामत | १०००/- | | २) | अनामत | १०००/- |
| ३) | ओळखपत्र | ५०/- | | ३) | ओळखपत्र | ५०/- |
| ४) | फॉर्म फी | ५०/- | | ४) | फॉर्म फी | ५०/- |
| | **एकूण** | **७१००/-** | | | **एकूण** | **६१००/-** |

**प्रवेश क्षमता (मुले)**

**३००**

**प्रवेश क्षमता (मुली)**

**१००**

**प्रवेश प्रक्रिया दिनांक**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अर्ज प्रसिध्दी दिनांक | :- | दि.०१/०७/२०२५ ते १०/०७/२०२५ अखेर |
| २. | प्रवेश अर्ज स्विकृती | :- | दि.११/०७/२०२५ ते २१/०७/२०२५ |
| ३. | प्रवेश अर्जाची छानणी | :- | दि.२२/०७/२०२५ ते २४/०७/२०२५ |
| ४. | प्रवेशमान्य विद्यार्थ्यांची यादी जाहीर | :- | दि.२५/०७/२०२५ ते २८/०७/२०२५ |
| ५. | प्रवेश शुल्क भरणे व अनामत रक्कम भरणे (चलनाद्वारे) | :- | दि.२९/०७/२०२५ ते ३१/०७/२०२५ |
| ६. | प्रत्यक्ष वसतिगृह सुरू | :- | दि.०१/०८/२०२५ पासून |
| ७. | दि.३१ मे २०२५ पर्यंत वसतिगृह चालू राहील. | | |
| ८. | सोबतच्या नियमावलीप्रमाणे | | |

प्रति,

मा.संपादक,

दैनिक ----------------------

----------------------------

(कादर शेख)

शिक्षणाधिकारी (प्राथ)

जिल्हा परिषद, सोलापूर.

**जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृह, पार्क चोक,**
**सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर व**
**सावित्रीबाई फुले विद्यार्थीनी वसतिगृह शेळगी,**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

**फोटो**

**प्रवेश अर्ज सन २०२५-२०२६**

दिनांक:- / /२०२५

**मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.),**
जिल्हा परिषद, सोलापूर

**रजि. नं.:-** **खोली क्रमांक:-**

महोदय,
मी ----------

तालुका ---------- जिल्हा सोलापुर, मोबाईल क्रमाक ________ आधार क्रमांक : ________ विनंती करतो/करते की, सोलापूर जिल्हा परिषदेच्या 'जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृह व सावित्रीबाई विद्यार्थीनी वसतीगृह, शेळगी, जिल्हा परिषद, सोलापूर येथे प्रवेश मिळणेसाठी हा अर्ज करीत आहे. माझी माहिती खालील प्रमाणे आहे.

१) संपूर्ण नांव ----------
२) जन्मतारीख :- / / वय : ________ वर्षे
३) मागासलेला असल्यास जात ---------- / बिगर मागासलेला
४) शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयाचे नांव ----------
---------- शिकत असलेला वर्ग ----------
५) सध्या शिकत असलेल्या वर्गात अनुत्तीर्ण आहात काय? ----------
६) मागील वर्षी वसतीगृहात राहत होता काय? ---------- (राहत असल्यास खोली नंबर नमूद करावा.)
७) पत्रव्यवहार पूर्ण पत्ता व मोबाईल क्रमांक:- ________
८) सायकल / मोटर सायकल वापरता काय? होय असल्यास, त्याचा तपशील ----------
९) विद्यार्थी व पालक यांचे आधार कार्ड रेशनकार्ड झेरॉक्स प्रत सोबत जोडावे.

**विद्यार्थ्यांची सही**

**पालकाची माहिती**

१) पालकाचे पूर्ण नांव ----------
मोबाईल क्रमांक ________
२) राहण्याचे ठिकाण :- गांव ----------, तालुका ---------- जि.सोलापूर

**पालकाची सही**

**शिफारस पत्र**

अर्जदार विद्याथी यांना मी ओळखत असून त्यांनी व त्यांच्या पालकांनी दिलेली माहिती खरी आहे. तेव्हा सोलापूर जिल्हा परिषदेच्या जवाहरलाल नेहरू विद्यार्थी वसतिगृहात व सावित्रीबाई फुले विद्यार्थीनी वसतीगृहात प्रवेश देण्यास तो पात्र आहे.

**नांव :** ----------

**रा. :** ----------

**सही**
**गटविकास अधिकारी (वर्ग-१)/**
**गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती,** ----------

# नियमावली

१) सोलापूर जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात ग्रामीण भागात ज्यांचे पालक राहतात त्यांचे पाल्यास विद्यार्जनासाठी प्रवेश दिला जाईल.

२) वसतिगृह प्रवेश घेण्यासाठी वसतीगृहाच्या छापील फॉर्ममध्ये अर्ज करणे अत्यावश्यक आहे.

३) इ.११ वी (कला, वाणिज्य, विज्ञान/१२ वी (कला, वाणिज्य, विज्ञान) / बी.ए. (FY. SY, TY)/ बी. कॉम. (FY. SY. TY)/ बी.एस्सी. (FY., S.Y. TY). शिक्षणा घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

४) गादी, सतरंजी, चादर इत्यादींची सोय विद्यार्थ्यांस स्वतः करावी लागेल.

५) रात्री ९ नंतर वसतिगृहाचे प्रवेश गेट बंद करण्यात येईल, याची दक्षता घ्यावी.

६) वसतिगृहातील विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रवेश घेताना वैद्यकीय तपासणी (निरोगी) बाबत दाखला देणे अनिवार्य आहे व तसा वैद्यकीय दाखला वसतीगृह प्रमुखाकडे द्यावयाचा आहे.

७) विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीवर कोणत्याही कारणासाठी जाऊ नये, जर अपघात झाल्यास त्यास विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील.

८) भिंतीवर खिळे ठोकू नयेत, तसेच फोटो, चित्रे अडकवू नयेत, भिंतीवर लिहू नयेत, भिंती स्वच्छ ठेवावे.

९) राहण्याच्या खोल्या स्वच्छ साफ ठेवण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल, स्वच्छता नसल्यास प्रवेश रद्द केला जाईल. तसेच वसतिगृहातील मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची काळजी प्रत्येक विद्यार्थ्यांनी घेतली पाहिजे. स्वतःचे मौल्यवान वस्तू (मोबाईल, रोख रक्कम, सोने इ.) ठेवू नये. जर चोरी झाल्यास त्यास विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील.

१०) वसतिगृहात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने सोलापूर जि. प. ची शिक्षण समिती ठरविलेले रक्कम प्रथम चलनाद्वारे अनामत रक्कम व फी एस.बी.आय. ट्रेझरी शाखा, सोलापूर मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि. प. सेस या खाते क्र. ३५१५५८५०७८० या क्रमांकावर भरावी. (प्रवेश फी रूपये ६,०००/- अनामत रूपये १,०००/- एकूण ७०००/- तसेच विद्यार्थीनींसाठी रूपये ५०००/- + १०००/- = ६०००/-)

११) विद्यार्थ्याने जर वस्तूचे नुकसान केल्यास संबंधित नुकसान त्याच्या अनामत रक्कमेतून वसूल केली जाईल. याबाबत मा.शिक्षणाधिकारी (प्राथ) यांचा निर्णय अंतिम राहील, तसे पालकांना कळविले जाईल, तसेच प्रवेश रद्द केला जाईल.

१२) विद्यार्थ्यांनी वसतिगृहातील आज्ञेचे पालन न केल्यास विद्यार्थ्यांवर कडक कारवाई केले जाईल व त्यास २४ तासाचे आत वसतिगृह सोडावे लागेल. विद्यार्थ्याने वसतिगृह कर्मचाऱ्यांशी नम्रतेचे वर्तन ठेवावे, गैरवर्तन केल्याचे आढळल्यास त्यावर मा.शिक्षणाधिकारी (प्राथ) यांचा निर्णय अंतिम राहील.

१३) विद्यार्थ्यांखेरीज इतर व्यक्तींना वसतिगृहात राहता येणार नाही. शासकीय, निमशासकीय अगर खाजगी अर्धवेळ व पूर्णवेळ नोकरी करणाऱ्यास प्रवेश मिळणार नाही. मित्र / पालक यांनी परवानगीशिवाय विद्यार्थ्यांना भेटू नये.

१४) वसतिगृहात मुलांना ज्वलनशील व इलेक्ट्रिक वस्तु (इस्त्री, पाण्याचे हिटर, शेगडी) वापरण्यास बंदी आहे. अशा वस्तू निदर्शनास आल्यास विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात येईल. तसेच दुर्घटना घडल्यास विद्यार्थ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

१५) गैरवर्तणूक करणाऱ्या व रूममधील वस्तूंची तोडफोड केल्यास अनामत रक्कम परत देण्यात येणार नाही व वसतिगृहातील प्रवेश रद्द केला जाईल.

१६) विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळाल्यावर खोली लाईटची (बल्ब) व्यवस्था स्वतः करावयाची आहे.

१७) सर्वसाधारणपणे वसतिगृह दिनांक ०१ ऑगस्ट २०२५ पासून चालू राहील.

१८) शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी प्रवेश चालू होत असल्याने १ वर्षाची फी **नेहरू वसतिगृहासाठी (रूपये ६,०००/-+ रूपये १,०००/- अनामत) आणि सावित्रीबाई फुले विद्यार्थ्यांनी वसतिगृहासाठी (रूपये ५,०००/- + रूपये १,०००/- अनामत)** आकारण्यात येईल.

१९) वसतिगृह सोडताना विद्यार्थी व विद्यार्थीनी आपापले सहित्य सोबत घेऊन जावे, खोलीला स्वतःचे कुलूप लावू नये.

२०) प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना रूम निश्चित झाल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही व स्वतःच्या मर्जी / पसंतीप्रमाणे खोली मिळणार नाही.

२१) वसतिगृह प्रवेश क्षमता मर्यादित असल्याने क्षमतेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास लॉटरी पध्दतीने विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२२) वार्षिक परिक्षेचे वेळापत्रक जाहिर (प्रसिध्द झाल्यानंतर विद्यार्थी हॉल तिकीट व वेळापत्रक कार्यालयात जमा करावे. आपआपल्या लेखी परीक्षा संपल्यावर वसतिगृह सोडावे लागेल व चेक आऊट केल्याशिवाय खोली सोडता येणार नाही.

२३) प्रवेश वेळी स्वतःचे राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक झेरॉक्स प्रवेश अर्जासोबत देणे अनिवार्य आहे.

२४) ओळखपत्र एकदाच देण्यात येईल, दुसरे ओळखपत्र मिळणार नाही व जुने ओळखपत्र चालणार नाही. ओळखपत्राशिवाय गेटमध्ये प्रवेश मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

२५) वर्ष संपताच वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वत:ची मोटार सायकल/सायकल स्वत:च्या जबाबदारीवर घेवून जाणे. वसतीगृहात ठेवू नये. चोरीला गेल्यास वसतीगृह जबाबदार राहणार नाही.

२६) सिक्युरिटी गार्ड व स्वच्छता कर्मचारी यांच्याशी गैरवर्तणूक करू नये. वसतीगृह रूममध्ये स्वच्छता राखावी.

**पालकाची स्वाक्षरी** **विद्यार्थ्यांची स्वाक्षरी**

**(शैक्षणिक संस्था / महाविद्यालयाने द्यावयाचा दाखला)**

**दाखला**

प्रमाणपत्र देण्यात येते की, श्री.------------------------------------------------

या कॉलेजमध्ये/संस्थेमध्ये ------------------------------------------------------------ या वर्गामध्ये सन २०२५-२०२६ करिता प्रवेश घेतला असून त्याचा र.नं.______________________ आहे.

सोलापूर, दिनांक :- / /२०२५

**प्राचार्याची स्वाक्षरी व शिक्का**